रजि. नं. आर. एन. २१४०२/१९७५ रजिस्टर्ड वुईथ रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर इंडिया

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक

रजि. नं. इ - २८२

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिकचे मासिक मुखपत्र

# सन्मार्गमित्र

सन्मार्ग दर्शयेत सम्यक् । प्रेरयेत् निजकर्मणि । सन्मार्गमित्रं सर्वेषाम् । भूयात् आनंद वर्धनम् ।।

* नाशिक * वर्ष ४३ वे * अंक ४ था * जुलै २०१८ (मासिक) * मूल्य : ₹ १०.००





# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था आणि समाज सहाय्यक संस्था, नाशिक

रजि. नं. इ-२८२

## * कार्यकारिणी *



ॲड. गोखले
गणेश वंसत
अध्यक्ष



ॲड. गोरवाडकर
नागनाथ मोहन
उपाध्यक्ष




सौ. मवाळ
सुजाता सुहास
उपाध्यक्षा



श्री. मुंगी
उदयकुमार दत्तात्रय
कार्याध्यक्ष



श्री. चिपळूणकर
अजित मधुकर
कार्यवाह



श्री. गांधी
मिलिंद शांताराम
कोषाध्यक्ष



श्री. कुलकर्णी
गंगाधर नारायण
सहकार्यवाह



श्री. सावजी
पांडुरंग वासुदेव
आधारस्तंभ



श्री. पाडेकर
सचिन सुरेश
देणगीदार



श्री. जोशी
चंद्रशेखर रामचंद्र
आश्रयदाता



सौ. जोशी अनघा
नारायण
सदस्या



श्री. जोशी
श्रीकांत चंद्रकांत
सदस्य




श्री. जोशी
अशोक पांडुरंग
सदस्य



श्री. सबनीस
सुभाष प्रमाकर
सदस्य



श्री. पंचाक्षरी
उल्हास एकनाथ
सदस्य



श्री. कुलकर्णी
विनोद केशव
सदस्य



श्री. कुलकर्णी
पवन अरुण
सदस्य



श्री. कुलकर्णी
सुभाष शंभुराव
सदस्य



श्री. देशमुख
गजानन विठ्ठल
सदस्य



सौ. गिजरे
शैला भालचंद्र
सदस्या

मासिक
# सन्मार्गमित्र
दर महिन्याच्या २५ तारखेला
प्रसिद्ध होणारे संस्थेचे मुखपत्र

वार्षिक वर्गणी
₹ १००.००

## अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक

जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबल जवळ, त्र्यंबकरोड, नाशिक - ४२२ ००२. फोन : २३१३५९९

**Website : abmsanstha.org**

**• Email : abmnsk@gmail.com, sanmargmitra2018@gmail.com**

✻ संपादक ✻
**सुभाष सबनीस**

✻ प्रकाशक ✻
**उदयकुमार मुंगी**

**✻ संपादक सहाय्य मंडळ ✻**
**अजित चिपळूणकर, ॲड.समीर जोशी, प्रा. लक्ष्मीकांत भट, सौ.अश्विनी पेशकार**

'सन्मार्ग मित्र' हे मासिक मालक अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था यांचेसाठी प्रकाशक उदयकुमार दत्तात्रय मुंगी यांनी रीप्लिका प्रिंटर्स, २ चिटको सेंटर, वकीलवाडी नाशिक येथे छापून अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था जलशुद्धीकरण केंद्राशेजारी त्र्यंबकरोड नाशिक ४२२००२ येथे प्रसिध्द केले. संपादक सुभाष प्रभाकर सबनीस (या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक आणि अ.ब्रा.म.संस्था सहमत असेलच असे नाही)

## संपादकीय मनोगत

# आत्मोन्नती...

परिस्थिती सापेक्ष असणे आज असलेल्या वातावरणात अत्यंत गरजेचे आहे. कालानुरूप आणि परिस्थितीनुरूप जर आपण बदललो नाही तर आपल्याला दुसऱ्या कुणाचे सोडा आपण स्वत: सुध्दा माफ करू शकणार नाही.

आज असलेले आपण सर्व स्वयंकेंद्रित झालो आहोत. केवळ स्वत:चा व आपल्या कुटुंबाचाच विचार करतो. परंतु हा समाज, हे सगळे जग आपलाच परिवार आहे हे तो विसरत चालला आहे. वसुधैवकुटुंबकम् हा शब्दच आपण विसरत चाललो आहोत. या जगात रहाणारे सर्व लोक आपले आई, वडील, भाऊ बहिण आहेत हे विसरलो आहे. यामुळे आपसातील स्नेह, सद्भावना, बंधुभाव, ममत्व संपले की काय अशी शंका येऊ लागली आहे. सामाजिक समरसता रसातळाला गेली आहे. आपल्या संबधातील, आपल्या संपर्कातील सर्वांना स्नेहाच्या धाग्याने जोडण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपला स्वभाव असा बनत चालला आहे की, आपण समोरच्या मधील फक्त दुर्गुण पाहतो, त्याच्यात काय खोट आहे तेच पाहतो. त्याऐवजी आपण त्याच्यातले सदगुण पाहिले, तर ही परिस्थिती बदलता येवू शकते. एकमेकांमधील दुरावा कमी होणे गरजेचे आहे. प्रत्येक गोष्टीत जर आपल्याला नाकारात्मकता दिसत असेल, प्रत्येकजण चुकत आहे असे आपल्याला वाटत असेल, तर आपल्याला आपल्या डोळ्यावरचा चष्मा बदलणे गरजेचे आहे. आपला दृष्टिकोन बदला आपल्याला सगळे चांगलेच दिसेल.

समाजात अनेक प्रकाराच्या सामाजिक संस्था कार्य करीत आहे. त्याठिकाणी काम करणारी माणसेच आहेत त्यांना समजून घ्या. ते लष्कराच्या भाकरी का भाजतात? ते लक्षात घ्या. एखाद्या संस्थेत काम करण्यासाठी, संस्थेसाठी आपण वेळ देऊ शकू एवढा वेळ आपल्याकडे आहे का? हा प्रश्न स्वत:लाच विचारा.

एखादी संस्था हे समाजाची सेवा करण्याचे साधन आहे हा विचार प्रत्येकाच्या मनात रुजला तर संस्था मोठ्या होतीलच आपण स्वत: सुध्दा मोठे होवू हा भाव ठेवून आपण अशा संस्थांशी जोडले गेले पाहिजे. राग, लोभ, मद, मत्सर मनात ठेवून जसे आपण आपल्या खाजगी जीवनात यशस्वी होवू शकणार नाही तसेच एखाद्या संस्थेचे काम करीत असताना सुध्दा कधीही यशस्वी होणार नाही. त्याचबरोबर अशा संस्थाना सुद्धा आपण मोठे होवू देण्याचे राहू द्या, पण अशा संस्था सुध्दा बंद पडतील. एखाद्या संस्थेत

काम करताना एक कार्यकर्ता म्हणून आपण काम केले पाहिजे. भले आपण तेथे पदाधिकारी का असेना, पण जर मालक म्हणून आपण जर वावरत असू, तर ती आपली मोठी चूक ठरेल. आपल्या जीवनात अडथळे वा समस्या निर्माण करणाऱ्या आपल्या स्वत:लाच वाकवून आपल्याला संपूर्णतेच्या ठिकाणापर्यंत पोहोचायचे आहे. त्यामुळे एखादी व्यक्ती माझ्याशी अशी का वागली? मला असे का म्हणाली? तिचे हे वागणे चुकीचे आहे? इत्यादी प्रश्न मनात निर्माण करून आपला वेळ वाया घालवणे म्हणजे कालव्यय होतो आहे असे समजावे. उडदामाजी काळे गोरे असतातच हे लक्षात ठेवले तर आपला भ्रमनिरस होत नाही.

सदैव लक्षात ठेवा की, आपले संपूर्णतेचे ध्येय गाठण्यासाठी वेळ अतिशय थोडा आहे. वाटेत येणाऱ्या अडथळ्यांना चांगल्या भावनेने पार केले तर अशक्य गोष्टीसुध्दा शक्य होतात. समुद्राप्रमाणे विशाल हृदय असले की, आत्मोन्नती होत असते. आत्मोन्नती झाली तरच आपण आपले संपूर्णतेचे लक्ष्य गाठू शकू. नैतिक मूल्यांच्या ऱ्हास होत असल्यामुळे पारिवारिक, सामाजिक, राजनैतिक व धार्मिक संघटना विखुरल्या जातात. म्हणूनच गुणवान बनणे ही काळाची गरज आहे. गुणवान व्यक्तींची युगयुगांतर पूजा होत असते. आपली पूजा नाही झाली तरी चालेल पण आपल्यानंतर आपल्याबद्दल कोणी चांगले बोलावे असे वाटत असेल, तर आपल्यालाच स्वत:मध्ये बदल करावा लागेल. 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' ही म्हण सार्थ करण्यासाठी आपण सद्‌गुणी बनणे आवश्यक आहे.

सद्‌गुणांचा संग्रह करणारी व्यक्ती फुलाप्रमाणे इतरांनाही सुगंध देत असते. जर आपल्याला आपल्यातील दुर्गुण दूर करायचे असतील तर सर्वगुण संपन्न बनणे हेच या तत्वज्ञानाचे मुख्य ध्येय आहे. पुस्तकी शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना नैतिकतेचे धडे देण्याची गरज आहे. त्यामुळे मानवी जीवनाला नवी दिशा प्राप्त होईल. या दिशेने वाटचाल केली तरच आपल्याला म्हणजेच संपूर्ण मानवतेला पूर्णत्वाकडे आणि संपन्नतेकडे घेऊन जाईल हे मात्र नक्की.

**– सुभाष सबनीस मो. ९८८१२४८४२९**

# मनुस्मृती- एक उहापोह

**मनुस्मृती या बाबत बरेचसे मतप्रवाह आहेत. मनुस्मृतीमध्ये जातीव्यवस्था वर्ण व्यवस्था याबाबत जे विवेचन केले गेले आहे ते आपल्याला समजावे म्हणून औरंगाबाद येथील श्री. सुशील कुलकर्णी यांनी अभ्यासपूर्ण असे काही लिखाण केलेले आहे. ब्राह्मण आणि जातीव्यवस्था याबाबत मनुस्मृती काय सांगते हे आपण पहाणार आहोत श्री सुशील कुलकर्णी यांच्या चष्म्यातून. श्री सुशील कुलकर्णी यांचे लेख आपल्याला त्यांच्या वेब साईटवर सुध्दा वाचता येतील.** www.downloadunlimited.in **हि त्यांची वेबसाईट आहे. त्यांचे काही लेख क्रमश: आपण वाचणार आहोत आपल्या सन्मार्गमित्रच्या अंकातून या लेख मालिकेतील दुसरा लेख.**

इतिहासाने अनेकवेळा आणि अनेक घटनातून समाजातील दुर्गुण आणि दोषांबाबत आपल्याला धडा देण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या–ज्या वेळी अशा भेदाभेदांच्या विषयात आपण अडकून पडलो त्या–त्या वेळी आपण पारतंत्र्यात गेलेलो आहोत. याच गोष्टीची जाणीव ठेवली नाही, तर पुन्हा एकदा मोठ्या संकटाला आपणास सामोरे जावे लागेल. राजकीय लाभापोटी जातीय भावना अधिक तीव्रतर करत स्वतःला उच्चकुलीन समजण्याची स्पर्धा आणि दुसऱ्या बाजुला आपल्यावर अन्याय होत असल्याची भावना वाढवत इथल्या संस्कृतीलाच धक्का लावला जात आहे. वेद किंवा मनुस्मृतीला लक्ष करत इतकी टिका केली जात आहे की, प्राचीन धर्म आणि धर्मग्रंथ अन्यायकारक होते. त्यांनीच ही व्यवस्था निर्माण केली. अशी भावना वृध्दींगत केली जात आहे. इथले आदर्श पुरुष आणि आणि धर्मग्रंथ यांच्याविषयी पाश्चात्य अभ्यासकांची मते अभ्यासून चुकीचे समज पसरवले जात आहेत.

यातील मनुस्मृती ग्रंथ असाच विवादित झाला आहे. त्या काळात मनुस्मृती असा पहिला ग्रंथ होता ज्यात कायदे आणि वर्तन पध्दतीबाबत लिहिले होते. त्या कालखंडात जी स्थिती होती. आवश्यकता होती, त्यापेक्षा त्याकाळातील धुरीणांना जसे आकलन होते त्याप्रमाणे मनुस्मृतीची रचना झाली आहे. आजच्या कालखंडातील संदर्भ जोडत त्याच मनुस्मृतीवर जातीआधारित समाजरचना निर्माण केल्याचा मोठा आरोप होतो. याच मनुस्मृतीने जातीप्रथा वाढवली उच्चनीच असा भेद करत जातीची उतरंड तयार केली. मनूनेच समाजातील खालचा वर्ग निर्माण केला आणि त्याचमुळे असा जातीय असमतोल झाला, असे मत व्यक्त झाले आणि आज मनुस्मृती जगातील सगळ्यात विवादास्पद पुस्तक झाले आहे.

आज अशी स्थिती आहे की, मनुस्मृतीविरोध हा आंदोलनाचा केंद्रबिंदू बनला आहे आणि मनुस्मृतीच्या समर्थक आणि अभ्यासकांसाठी मनुवादी ही एक शिवी बनली आहे. सामाजिक आक्रमणांच्या भयापोटी अनेक विद्वान मनू मांडत नाहीत अथवा

त्याची योग्यायोग्य चिकित्सा कोणी करताना दिसत नाही. जे काही समोर येतं ते फक्त मनुस्मृती चूकच कशी याबाबतचे मत किंवा मनुस्मृतीमधील श्लोकांचे संदर्भ देत हिंदू जीवन पध्दतीवर नोंदविलेले आक्षेप. जरी कोणी चिकित्सक पध्दतीने मनूचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आणि मनुस्मृतीमधील काही गोष्टी समोर आणण्याचा प्रयत्न केला, तर त्या तुम्ही घुसडल्या असतील असा खुशाल आरोप करत त्या प्रयत्नांना एक डाव मानले जाते. मनुस्मृतीचा रचियता मनू जातीप्रथा माणणाऱ्या लोकांसाठी नायक आहे, तर विरोधकांनी त्याची खलनायक अशी प्रतिमा निर्माण केली आहे. वास्तविक मनूला समर्थन करणारे देखील मनूची खलनायक अशी प्रतिमा होण्याला तेवढेच दोषी आहेत. मनूने जे हजारो वर्षांपूर्वी लिहिले त्याची कालसुसंगत चिकित्सा न करता जशास तसे उलटपक्षी स्वतःला उच्चवर्णीय समजणाऱ्या व्यक्तीना लाभकारक होईल अशाच पध्दतीने मनू सांगितला व प्रचारित केला. याचा परिणाम असा झाला की, मनुस्मृतीला विरोध करणे अथवा मनुस्मृती नाकारणे पुरोगामी विचारांची पहिली पायरी झाली.

ज्या देशात मनुस्मृतीचा कायदा चालतच नाही, जी मनुस्मृती देशातील तीन टक्के वर्गाला देखील अजून नीटशी ठाऊक नाही. अगदी बोटावर मोजण्याइतक्या लोकांनी तिचा अभ्यास केला असेल, तिच मनुस्मृती पसरविलेल्या विषयाच्या आधारावर अनेकांच्या तिरस्काराचे कारण बनली. शिवाय ती राजकारण पेटविण्याचे साधन बनली. मनुस्मृतीचे विरोधक सोडा पण निदान समर्थकांनी तरी मनुस्मृतीचा नीट अभ्यास केलेला दिसत नाही.

मनुस्मृतीच्या स्वार्थी समर्थकांनी देखील मनुस्मृतीचा आपल्या लाभासाठी वापर केला आहे. जातीय अहंकार आणि स्वतःच्या उच्चतेची शेखी मिरविणाऱ्या वर्गाने देखील काही चुकीच्या आणि घुसडलेल्या आणि असलेल्या श्लोकांचा चुकीचा दाखला देत जातिप्रथा योग्यच असल्याचा दावा केला. जे मांडलं जातं त्याच्या अगदी उलट मनुस्मृती सांगत आहे, असे लक्षात येईल. पण त्यासाठी मनुस्मृतीचा अभ्यास करावा लागेल. तोदेखील समर्थन अथवा विरोध असा पूर्वग्रह मनात न ठेवता ती वाचावी लागेल, तरच हे लक्षात येईल.

या दोन वादाच्या पार्श्वभूमीवर भारतात एक तिरस्काराचे राजकारण जन्माला आले आहे. हा जातिभेदच या देशाला नुकसानकारक ठरला आहे. परकीय आक्रमकांनी याच जातिप्रथेचा आणि विभक्त समाजाचा लाभ घेत अनेक वर्षे या देशावर राज्य आणि त्याची लूट केली आहे. आणि या राज्य व लुटीसाठी सोय व्हावी म्हणून वेद आणि पुराणांचे त्यांना अनुकूल ठरतील असे अर्थ लावत या देशातील सामाजिक दरी अधिक वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. प्राचिन काळात हा देश अनेक विद्वान आणि प्रचंड प्रतिभाशाली लोकांचा देश होता. पराक्रमी आणि चक्रवर्ती सम्राटांचा हा देश होता. आजही या देशात प्रतिभा बुध्दिमत्ता आणि ज्ञान याची कमतरता नाही. पण या देशाला समृध्दी आणि सशक्तीकरणाकडे नेण्याची आपली क्षमता इथल्या जातिप्रथेमुळे पुर्णत्वाने वापरता येत नाही हे वास्तव आहे. ही प्रथा खरच मनूने सुरुवात केली आहे का? मनू या तिरस्काराला पात्र आहे का? असेल तर काय आहे त्यात नेमके असे? आणि नसेल तर नेमके काय भ्रष्ट स्वरूपात मांडले गेले? मनूच्या श्लोकाचा अर्थ काय आहे? हे सगळं जाणून घ्यावे लागेल.

हे सगळं पुन्हा मनूचे राज्य आणण्यासाठी नाही तर त्यामुळे जो तिरस्कार समाजातील लोकांत भरला आहे, तो कमी करण्याचा हा अल्पसा प्रयत्न असेल. आज देशात सुरू असलेले कायद्याचे राज्य संविधानाचे राज्य सक्षम आणि समर्थ आहे. पण हजारो वर्षांपूर्वी त्या काळात तयार झालेले कायद्याचे पुस्तक (याला कायद्याचे पुस्तक माणायचे की, नाही हा ज्याचा त्याचा व्यक्तिगत विषय आहे. येथे सोयीसाठी तत्कालीन कायद्याचे पुस्तक असा उल्लेख करतो आहे.) नेमके काय होते ते जाणून घेण्याचा हा प्रयत्न आहे आणि त्यापेक्षाही पुढची गोष्ट म्हणजे खरच मनुस्मृतीचा वापर करत जर समाजातील काही घटकांवर अन्याय झाला असेल तर तो समजून घ्यावा याच समाजाचा घटक म्हणून आपण त्यांची मनःपूर्वक क्षमा मागावी हाच त्या मागचा हेतू आहे. एखाद्या पुस्तकाचा आधार घेत कोणी आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी समजाघटकाला पशुतुल्य वागणूक दिली असेल, तर ते नक्कीच क्षम्य नाही. मग ते कोणत्याही काळात कोणत्याही स्थितीत घडलेले का असेना.

व्यक्ती चुकला आहे. नक्कीच चुकला आहे.

**आचाराद्विच्युतो विप्रो न वेदफलणश्नुते।**
**आचारेन तु संयुक्तः संपूर्णफलभाग्भवेत।।**

अध्याय १ श्लोक १०९

अर्थात आचारापासून भ्रष्ट झालेल्या ब्राह्मणाला (तो प्रज्ञावंत असला तरी) वेदांमध्ये सांगितलेले फळ प्राप्त होत नाही. पण जो आचार संपन्न आहे, त्याला वेदांमधील फळ प्राप्त होते.

नेमके हे विसरले गेले. आपल्या फायद्याचे तेवढे उचलण्याची आणि कर्तव्याचा भाग विसरण्याची वृत्तीच याला कारणीभूत होती.

**सर्वं स्वं ब्राह्मणस्येदं यत्किं चिज्जगतीगतम् ।**
**श्रैष्ठ्येनाभिजनेनेदं सर्वं वै ब्राह्मणोऽर्हति ।। १.१०० ।।**
**स्वं एव ब्राह्मणो भुङ्क्ते स्वं वस्ते स्वं ददाति च ।**
**आनृशंस्याद्ब्राह्मणस्य भुञ्जते हीतरे जनाः ।। १.१०१ ।।**

हे एवढे लक्षात ठेवले आणि सांगितले मात्र १०९ व्या श्लोकाकडे मात्र संपूर्ण दुर्लक्ष केले. याचाच तर परिणाम पुढे जातीय

असंतोषात झाला. नेहमी अर्धसत्य सांगत ते पूर्णसत्य असल्याचा करून दिलेला आभास हा त्या व्यक्ती, ज्ञाती, धर्म आणि धर्मग्रंथ यांना लोकांपासून तोडत होता याचा विसरच पडला.

मात्र त्या व्यक्तीने चूक करताना त्याच्या धर्मग्रंथातील शिकवण अथवा नियमांचा चुकीचा अर्थ सांगत चूक केली असेल, तर त्या व्यक्तीला दोष देत असताना तो धारण करत असलेल्या धर्माला आणि त्याच्या धर्मग्रंथांना देखील दोष दिल्या जाऊ लागला. तो स्वाभाविक देखील होता. माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळत नसेल, तर तुमचे धर्मरक्षकही नको आणि त्या धर्माचे ग्रंथही नको असा भाव मनात येणे नैसर्गिक आहे. मात्र खरेच या धर्मग्रंथाचा हा दोष आहे का? हे देखील तपासले गेले पाहिजे. कारण जसा जसा काळ पुढे सरकत गेला तसतसे याच संतापाच्या भावनांचा वापर करत हा संताप असंतोषात आणि असंतोष बंडात परावर्तित व्हावा यासाठी परकीय व परधर्मीय शक्तींनी नियोजनबध्द प्रयत्न केल्याचे आपल्या लक्षात येईल.

अशी परकीय आक्रमण होत असतील, तर नक्कीच याबाबत चिकित्सा होणे आवश्यक ठरते. पुराणकाळात जे काही चुकीचे, अन्यायकारक घडले ते मानवी चूक होती की, ग्रंथातच चुकीचे आदर्श ठेवले होते, याचा विचार तर केला गेलाच पाहिजे. त्याचसाठीच तर हा लेखनप्रपंच आहे.

**वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीले च तद्विदाम् ।**
**आचारश्चैव साधूनां आत्मनस्तुष्टिरेव च ।। २.६ ।।**

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे चार वेद धर्माचे मूलाधार आहेत. वेदवेत्या ऋषींनी त्यांच्या आधारे स्मृतींची रचना केली आहे. सज्जनांचे वर्तन, सदाचार, शील हे ही धर्माचे मूळ आहे. ज्या स्थितीत संदेह निर्माण होईल त्यावेळी ज्याचा स्वीकार केल्यावर धर्माचरणी म्हणजे सदाचार, शील याने वर्तन करणाऱ्या माणसाची तुष्टी होईल तो मार्ग स्वीकारावा.

**अर्थकामेष्वसक्तानां धर्मज्ञानं विधीयते ।**
**धर्मं जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः ।। २.१३ ।।**

धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी अर्थ व काम यांच्याविषयी ज्यांच्या मनात आसक्ती नाही. त्यांनाच धर्मज्ञान सांगितलेले आहे. धर्मज्ञानाची इच्छा करणाऱ्या मनुष्यास श्रुति अर्थात वेद हेच मुख्य प्रमाण आहे. वेदांचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी इंद्रियदमन ही पहिली पायरी आहे. म्हणून अर्थ व काम या विषयी अनासक्ती महत्वाची आहे.

# दीप अमावास्या

आषाढातील अमावास्या म्हणजे दीप अमावास्या म्हणून ओळखली जाते. अगदी अलीकडे या अमावास्येला गटारी अमावास्या असे संबोधले जाते. श्रावण महिन्यात जे लोक मांसाहार करीत नाहीत ते लोक या दिवशी मांसाहार करतात, मनसोक्त पितात. हल्ली त्याला ड्रिंक्स घेणे असे म्हणतात. नंतर गटारात लोळतातही. पण या गटारी या शब्दाशी आपल्याला काही देणे घेणे नाही.

तर काय आहे ही दीप अमावास्या? आषाढ महिन्यात पाऊस रिपरिप पडत असतो. धरणीमातेने हिरवी शाल पांघरलेली असते. अतिशय प्रसन्न वातावरण असते. पण या सततच्या पावसाने रोगराई सुध्दा डोकं वर काढते. अनेक रोग संक्रमित होत असतात. पूर्वीच्या काळी आपल्या गावामधून ही रोगराई जावी म्हणून अशा रोगाच्या जंतुना गावच्या सीमेच्या बाहेर आमिष म्हणून काही पदार्थ नैवेद्य म्हणून दाखवायचे, जेणे करून हे रोगाचे जीवजंतू त्यावर बसावे व ते गावाच्या बाहेरच राहावे हा हेतू. आषाढ महिन्यात असे घरोघरी नैवेद्य म्हणून पदार्थ तयार करीत. यालाच ग्रामीण भाषेत आषाढ तळणे असेही संबोधले जायचे. आषाढ संपता संपता पावसाचे प्रमाणही कमी होत असते. म्हणून आषाढ महिन्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच अमावास्येला आपल्या घरात असलेली रोगराईची पीडा टाळावी म्हणून आपल्या घराची साफसफाई करून आपल्या जीवन प्रकाशमान व्हावे व एका नवीन ऋतूची सुरुवात आपल्या आयुष्यात व्हावी म्हणून घरातील सर्व दिवे जसे की, पितळी दिवे, समया, निरांजनी, तांब्याच्या दीपदानातील दिवे, लामणदिवे, कापूर लावतो त्या आरतीची भांडे, उदबत्तीचे घर असे सर्व अलीकडे असे दिवे आपल्याकडे असतातच असे नाही. मग लाईट, ट्यूब लाईट, कंदील, असे सर्व दिवे घासून पुसून त्याची पूजा केली जाते. हे सर्व दिवे आपण काही रोज रोज घासत नाही व या अशा रोगराईचे जीवजंतू या तेलकट तुपकट दिव्यांवर पोसतात म्हणून हे दिवे घासून पुसून साफ करायचे. संध्याकाळी दिवेलागणीला घरामध्ये गाईच्या शेणाने सारवून एक पाट ठेवायचा त्याच्या भोवती रांगोळी काढायची, त्यावर सर्व दिवे मांडून ठेवायचे. त्याना हळद, कुंकू, अक्षदा, फुले वाहायची, कणकेचे गोड दिवे करायचे ते उकडायचे किंवा तळायचे त्यात साजूक तूप व कापसाची वात घालून सर्व दिवे पेटवायचे आणि त्या दिव्यांनी सर्व दिव्यांची आरती करायची, नैवेद्य दाखवायचा. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये दिव्याला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. संध्याकाळी दिवेलागणीच्या वेळी लक्ष्मी आपल्या घरात येते व दारिद्र्य निघून जाते असे आपली कल्पना आहे. म्हणूनच दिव्याची अमावास्या व ती साजरी करण्याची भावना जर आपण लौकिक अर्थाने समजून घेतली तर त्याचे महत्त्व आपल्याला समजून येईल.

**माँ की दवाईका खर्च बेटे को मजबूरी लगता है, सिगारेट का धुवाँ उसे जरूरी लगता है ।**

# दर्पण- पर्यावरणपूरक शाडुमाती गणपती कार्यशाळा

वाट तुझ्या आगमनाची... नको प्लॅस्टर ऑफ पॅरिस मुर्ती मला नको... म्हणून मी स्वत: माझ्या हाताने बनवणार आहे माझा श्री गणेश!

शाडुमातीपासून गणपती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित केली असून यात जरूर सहभागी व्हा. सर्व साहित्य आम्ही पुरवू आपण एक छोटी लाकडी फळी किंवा पॅड आणावा. चला गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करू या. मूर्तीची पावित्रता व मांगल्य राखण्यासाठी आपण स्वत: मूर्ती बनवूया!

| नाव नोंदणी | | | |
|---|---|---|---|
| दिनांक | वेळ | ठिकाण | प्रवेशमूल्य |
| १२ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१८ | सकाळी ८ ते ११.३०<br>सायं. ६ ते ८.३० | ४४७०, घोलपवाडा, कपालेश्वर मंदिरा मागे, पंचवटी, नाशिक | २०० रू. |
| **कार्यशाळा** | | | |
| रविवार, दि. २ सप्टेंबर २०१८ | सकाळी १० ते १२<br>दुपारी ३.३० ते ५.३० | १) स्वप्नदिप, बाजीराव नगर, तिडके कॉलनी, नाशिक<br>२) अखिल भारतीय ब्राह्मण समाज पंचवटी केंद्र, गर्गे हॉल शौनकाश्रम शेजारी, खांदवे सभागृहाजवळ, पंचवटी, नाशिक | |

टीप : * पूर्व नावनोंदणी आवश्यक. * प्रथम २५ जणांनाच प्रवेश. त्वरा करा!

**संपर्क : स्वाती – ९४२०६९४०२७, वृषाली – ९९२२७८१३६०, मनिषा – ९५५२१४१५२१**

# ''हसरा, नाचरा जरासा लाजरा सुंदर साजिरा श्रावण आला''

आता आपल्याला चाहुल लागली आहे ती श्रावण महिन्याची. श्रावण हे नावच मनाला किती प्रसन्न करून जाते या काळात निसर्गातही अमुलाग्र बदल झालेले असतात. पावसाने रान, मळे तृप्त झालेले असतात. नजर जाईल तिथपर्यंत हिरवे गालीचेच अंथरले दिसतात. त्यावर सुंदर रानफुलांची नक्षी रेखाटलेली, कुठे दवबिंदू तर कुठे फुलपाखरे... मग सुरू होतो ऊन पावसाचा पाठशिवणीचा खेळ. त्यातून कधी आकाशात इंद्रधनू ! किती सुजलाम् सुफलाम् झालेलं असत ना सगळ..! हे झालं बाहेरच आणि घरात रेलचेल असते ती व्रतवैकल्यांची, सणावाराची पण आम्ही खरंच जाणून घेतलयं का? या व्रतवैकल्या मागचं विज्ञान? असा प्रश्न विचारला की हल्लीच्या पिढीला हे निरोपयोगी किंवा अंधश्रद्धेचे वाटू शकते म्हणून आपण सणांचे व्रतांचे महत्त्व मुलांना सांगत असताना त्या मागील विज्ञानही जरूर सांगावे. पौर्णिमेच्या मागेपुढे 'श्रवण' नक्षत्र येते म्हणून 'श्रावण' असे म्हणले जाते. या महिन्यात नागपंचमी, मंगळागौर, रक्षाबंधन, नारळीपौर्णिमा, श्रावणी, श्रीकृष्णजन्माष्टमी, गोपाळकाला व पिठोरी अमावास्या हे सण येतात.

– **वृषाली घोलप** ९९२२७८१३६०

# आवड, आचरण व अभ्यास यांचा मेळ घालून शिक्षण घ्यावे – सौ. मंजूषा वैद्य

विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना आपली आवड तसेच स्वभावात नम्रता व अभ्यासातील चिकाटी धरल्यास त्यांना त्यांचे क्षेत्रात यश मिळवणे सोपे जाते. अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था (नाशिक) पुणे केंद्राच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार व शिक्षक पुरस्काराच्या निमित्ताने त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळेस व्यासपीठावर संस्थाध्यक्ष ॲड. गणेश गोखले, मा. श्रीकृष्ण चितळे (चितळे बंधू) व कार्यवाह सौ. सुजाता मवाळ उपस्थित होते. यावेळी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय काम केलेल्या सौ. निलीमा वळामे, सौ. जयश्री अत्रे व सौ. शिल्पा दातार या शिक्षकांना पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच श्री. अविनाश नाईक यांना कै. चंद्रकांत जोशी यांचे स्मरणार्थ सामाजिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याचबरोबर इ. १० वी व १२ वी इयत्तेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले. केंद्रप्रमुख गणेश गोखले यांनी उपस्थितांचे स्वागत केले. संस्था परिचय संस्था सदस्य श्री. विश्वनाथ भालेराव यांनी केला. तर आभार प्रदर्शन कार्यवाह सौ. सुजाता मवाळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अपर्णा मोडक यांनी केले. कार्यक्रमास माजी नगरसेवक डॉ. सतीश देसाई, नगरसेविका सौ. मंजुश्री खर्डे कर, माजी नगरसेवक श्री. दिलीप काळोखे, सौ. नीता पारखी, श्री. मकरंद माणकीकर, सौ. सरिता काळे, सौ. अनघा जोशी, सौ. सुवर्णा रिसवुड, श्रीकांत जोशी उपस्थित होते.

**एखाद्या व्यक्तीबद्दल गैरसमज करू घेण्याआधी त्याच्याशी एकदा मोकळेपणाने बोला.**

ओळख

# श्रीमद्‌भगवद्‌गीता आणि दैनंदिन जीवन

।।श्री गोपालकृष्णाय नमः ।। ।।ॐ श्री परमात्मने नमः ।।

**नारायणं नमस्कृत्य, नरं चैव नरोत्तमम् ।**
**देवी सरस्वती व्यासं ततो जय मुदीरयेत् ।।**

(महाभारत आदिमश्लोक)

'श्री नारायणाला, नरांमध्ये उत्कृष्ट' जो नर त्याला, श्री सरस्वतीदेवी आणि व्यासांना नमस्कार करून मग जय म्हणण्यास सुरूवात करा.

**श्रीमद्‌भगवद्‌गीता आपला धर्मग्रंथ**

अत्यंत तेजस्वी व निर्मल हिरा आहे. यात पिंड ब्रह्मांडाचे ज्ञानपूर्वक विवेचन आहे. अध्यात्मविद्या तिची तत्वे, पावित्र्य थोडक्यात सांगितले आहे. त्यामुळे मनुष्यांना आपल्या अध्यात्मिक पूर्वावस्थेची माहिती होते आणि त्याबरोबरच भक्तीची ज्ञानाशी व्यावहारीक अशी सुंदर जोड घातली जाते. त्यामुळे संसारात भांबावून गेलेल्या सामान्य जनांच्या मनास अतिशय शांती देणारा आणि विशेषतः निष्काम कर्माला प्रवृत्त करणारा हा अत्यंत हितोपयोगी असा ग्रंथ– संस्कृतातच काय पण जगातील इतर वाङ्मयातही सापडणार नाही.

केवळ काव्य म्हणून पाहिले तरी आत्मज्ञानाचे अनेक गहन सिद्धांत अतिशय प्रासादिक भाषेत सांगितले आहेत. त्यामुळे तरुणांपासून वृद्धांपर्यंत हा ग्रंथ अत्यंत सुगम आहे, सोपा आहे. शिवाय ज्ञानयुक्त असून सुद्धा भक्तिरसाने अगदी ओतप्रोत भरलेला हा ग्रंथ उत्तम काव्य म्हणूनही गणला जातो.

खरचं! सकल वैदिक धर्माचे सार, श्रीभगवंताच्या वाणीने ज्यात साठविले आहे त्या गीताग्रंथाची थोरवी किती वर्णावी?

भारतीय युद्ध समाप्त झाले आणि भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन मोठ्या प्रेमाने गोष्टी बोलत बसले होते. त्यावेळी अर्जुनाने भगवंताच्या जवळ एक इच्छा प्रगट केली. त्याला भगवंताच्या मुखातून अजून एकदा गीता ऐकाविशी वाटली. म्हणून त्याने श्रीकृष्णांना अशी विनंती केली, ''भगवंता युद्धारंभी केलेला उपदेश मी विसरलो, मला तो कृपा करून सांगा.

भगवंत म्हणाले, ''अरे अर्जुना, तो उपदेश त्याप्रसंगी अगदी योगयुक्त चित्ताने केला असल्यामुळे तोच उपदेश तसा सांगणे अगदी मला अशक्य आहे.''

खरं तर भगवान श्रीकृष्णाला काही अशक्य आहे का? काहीच नाही पण त्यांनी सुद्धा गीता सांगणे अशक्य म्हणावे?

यावरूनच श्रीमद्‌भगवत् गीतेची थोरवी केवढी मोठी आहे हे समजते. वैदिक धर्मात अनेक संप्रदाय आहेत पण वेदाप्रमाणेच हा ग्रंथ सर्वांना प्रमाणभूत होऊन बसला आहे.

**सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः।**
**पार्थो वत्सः सुर्धीभोक्ता दुग्धं गीतामृतम् महत्।।**

''सर्व उपनिषदे याच कोणी गायी, भगवान श्रीकृष्ण स्वतः दूध काढणारे (गवळी) बुद्धिमान अर्जुन हा (त्या गायींना पान्हा आणणारा) भोक्ता वत्स, अशी अपूर्व सामुग्री जुळून आल्यानंतर जे दूध काढले गेले ते हे मोठे गीतामृत'' असे गीताध्यायात अलंकारयुक्त पण यथार्थ वर्णन केले आहे.

भारतात तर अनेक भाषात याची भाषांतरे, टीका, निरुपणे आहेतच पण पाश्चिमात्य देश, ग्रीक, लॅटिन, जर्मन, फ्रेंच, इंग्रजी वगैरे अनेक भाषांतूनही गीतेची अनेक भाषांतरे होऊन या अप्रतिम ग्रंथाची जगभर प्रसिद्धी झाली.

वैदिक प्रस्थानत्रयीत भगवद्‌गीता हा स्मार्त मार्ग आहे. स्मार्त म्हणजे विवेकाधिष्ठित धर्ममार्ग. विवेकाचे अधिष्ठान असणारा मार्ग उपनिषदांचा अभ्यास करायचा असेल तर आपल्याकडे विद्‌वत्ता पाहिजे. वेदांचा अभ्यास करायचा असेल तर आपल्याजवळ ज्ञान पाहिजे. ब्रह्मसूत्रांचा अभ्यास करायचा असेल तर आपल्याठायी कुशाग्रबुद्धि हवी.

पण भगवद्‌गीतेचा मार्ग स्मार्त मार्ग आहे. तो सुलभ आहे, सोपा आहे, सरळ आहे. उपनिषदांत मंत्र आहेत. ब्रह्मसूत्रांत सूत्रे आहेत आणि भगवद्‌गीतेत श्लोक आहेत. आणि हे श्लोक प्रत्यक्ष भगवंताच्या मुखातून आले आहेत. त्यामुळे श्लोक मंत्रही झाले आणि सूत्रेही झाले.

सर्व उपनिषदांचे सार या गीताग्रंथात आले आहे इतकेच नव्हे तर या ग्रंथाचे संपूर्ण नाव ''श्रीमद् भगवत्‌गीता उपनिषद' असे आहे. गीतेच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटी अध्याय समाप्ती दर्शक जो संकल्प असतो त्यात इति 'श्रीमद्‌भगवद्‌गीतासूउपनिषत्सु' इत्यादी शब्द असतात. हा संकल्प मूळ महाभारतात नाही पण गीता ग्रंथाच्या टीकेत असल्यामुळे तो प्रचारात आहे.

''श्रीमद्‌भगवद्‌गीता'' ही स्त्रीलिंगी संज्ञा आहे. विनोबाजी गीतेला गीताई, माऊली म्हणतात कारण माऊलीच्या ठिकाणी विलक्षण वात्सल्य असते. स्त्री शक्ती ही सुद्धा विलक्षण थोर असते. त्यामुळे तिच्या वात्सल्यात आणि शक्तीत अपार असे अमृत भरलेले आहे. सर्वशास्त्रमयी अशी गंगा सदैव वहात असते.

शास्त्र सांगते, ''दहा उपाध्यायासमान एक आचार्य असतो.

**कोणाला मदत करण्यासाठी मन मोठे असावे लागते. परिस्थिती चांगली असून चालत नाही.**

शंभर आचार्यंसमान पूज्य पिता असतो आणि पित्यापेक्षा मातेची थोरवी सहस्त्रगुणित असते.'' (मनु. २.१४५)

कोणत्याही ग्रंथाचे परीक्षण दोन प्रकारांनी करतात

१) अंतरंग परीक्षण २) बाह्यरंग परीक्षण

अंतरंग परीक्षण म्हणजे संपूर्ण ग्रंथ अवलोकन करून त्यातील मर्म, रहस्य, मतितार्थ किंवा प्रमेय काढणे.

**बहिरंग परीक्षण म्हणजे –** ग्रंथ कोणी केला, कुठे केला, त्याची भाषा कशी आहे, काव्यदृष्ट्या त्यात प्रासादिकता माधुर्य आहे का? ग्रंथातील रचना व्याकरणशुद्ध आहे का? कोणकोणत्या मतांचा स्थलांचा किंवा व्यक्तिंचा त्यात उल्लेख केलेला आहे. त्यानुसार ग्रंथ काल कोणता? समाजस्थिती कशी? ग्रंथातील विचार स्वतंत्र कि दुसऱ्यापासून घेतले आहेत इत्यादी बाह्यांगाचे वर्णन म्हणजे बहिरंग परीक्षण होय.

**श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे बहिरंग –** भगवंतानी जी गीता सांगतली आणि अर्जुनाने ती आपल्या अंत:करणात धारण केली त्याचे एकूण सातशे श्लोक आहेत. अठरा अध्याय आहेत. ''अर्जुन विषाद योग'' प्रारंभी व ''मोक्ष संन्यासयोग'' शेवटी आहे.

| | | |
|---|---|---|
| अध्याय पहिला | अर्जुन विषाद योग | श्लोक ४७ |
| अध्याय दुसरा | सांख्ययोग | श्लोक ७२ |
| अध्याय तिसरा | कर्मयोग | श्लोक ४३ |
| अध्याय चौथा | ज्ञानकर्म संन्यासयोग | श्लोक ४२ |
| अध्याय पाचवा | कर्मसंन्यास योग | श्लोक २९ |
| अध्याय सहावा | आत्मसंयम योग | श्लोक ४७ |
| अध्याय सातवा | ज्ञानविज्ञान योग | श्लोक ३० |
| अध्याय आठवा | अक्षरब्रह्म योग | श्लोक २८ |
| अध्याय नववा | राजविद्याराज गुह्ययोग | श्लोक ३४ |
| अध्याय दहावा | विभूति योग | श्लोक ४२ |
| अध्याय अकरावा | विश्वरूप दर्शनयोग | श्लोक ५५ |
| अध्याय बारावा | भक्तियोग | श्लोक २० |
| अध्याय तेरावा | क्षेत्रक्षेत्रज्ञ विभाग योग | श्लोक ३४ |
| अध्याय चौदावा | गुणत्रयविभाग योग | श्लोक २७ |
| अध्याय पंधरावा | पुरुषोत्तम योग | श्लोक २० |
| अध्याय सोळावा | दैवासुरसंपद्विभाग योग | श्लोक २४ |
| अध्याय सतरावा | श्रद्धात्रय विभाग योग | श्लोक २८ |
| अध्याय अठरावा | मोक्षसंन्यास योग | श्लोक ७८ |
| | **एकूण श्लोक** | **७००** |

भगवंतानी गीता सलगपणे सांगितली. गीतेची अध्यायवार मांडणी श्री व्यासांनी केली. या संपूर्ण गीतेत चार वक्ते आहेत. या चार वक्त्यात गीतेचे सातशे श्लोक विभागले गेले आहेत. त्यातील प्रमुख वक्ता अर्थात भगवान गोपालकृष्णच आहेत. म्हणून भगवंताच्या मुखातून पाचशे चौऱ्याहत्तर श्लोक आले आहेत. अर्जुनाच्या मुखात चौऱ्याऐंशी श्लोक आले आहेत. संजयाच्या मुखामध्ये एक्केचाळीस श्लोक आले आहेत आणि आरंभीचा एकमेव श्लोक धृतराष्ट्राच्या तोंडून निघाला आहे.

गीतेत प्रामुख्याने दोन छंद आले आहेत. त्यातील अनुष्टुप छंद हा सर्वप्रधान आहे. त्याचे चार चरण असतात. आणि एकूर बत्तीस अक्षरे असतात. प्रत्येक चरणात आठ आठ अक्षरे असतात. ज्याच्या पठनाने आपल्या चित्तवृत्ती स्तब्ध होतात आणि अद्वैताचा साक्षात्कार होतो. त्याला अनुष्टुप छंद म्हणतात. या छंदाला सरस्वती असेही नाव आहे.

गीतते त्रिष्टुप् या नावाचा दुसरा छंद आहे. त्याच्यात प्रत्येक चरणत अकरा अक्षरे असतात. एकूण अक्षरे चव्वेचाळीस असतात. अनुष्टुभ छंदात सहाशे पंचेचाळीस व त्रिष्टुभ छंदात पंचावन्न श्लोक आहेत. या भगवद्‌गीतेची अशी गम्मत आहे. इथे जो वक्ता आहे तो भगवान श्रीकृष्ण आहे.. श्रोता जो आहे तो भगवान श्रीकृष्णच आहे. आणि ज्याने हे तत्वज्ञान ग्रथित केले आहे तेही स्वत: भगवान श्रीकृष्णच आहे. १० व्या अध्यायात 'वृष्णींना वासुदेवोऽस्मि' 'पाण्डवांना धनंजय:' 'मुनिनामप्यहं व्यास:' असे म्हटले आहे. आणि अर्थात हा अद्वैताचा त्रिवेणीसंगमच आहे.

अशी ही भगवंताची वाणी त्यातील तत्त्वज्ञान पचायला जड आणि दुर्बोध आहे तरीही आपले आयुष्य उजळून जाते. म्हणून एक गीताशास्त्र अनुसरावे अन्य शास्त्रांची आवश्यकताच नाही.

।। इति श्री ।।

गीता उपदेशाची पार्श्वभूमी पुढील अंकी–

**– सौ. अनघा चिपळूणकर**

**'ओळख' हे सदर सुरु केले असून प्रत्येक अंकात**

**सौ अनघा चिपळूणकर**

आपल्याला श्रीमत् भगवतगीता आपल्या दैनंदिन जीवनात कशी उपयोगी पडू शकते याची ओळख करून देणार आहेत.

# ।। गुरुपौर्णिमा ।।
# भगवान श्रीवेदव्यास



**व्यास वसिष्ठानप्तारं शक्ते: पौत्रमकल्मषम् ।**
**पराशरात्मजं वन्दे शुकतातं तपोनिधिम् ।।**

भारतीय संस्कृतीने श्रीव्यासांना सादर वंदन करणारा हा श्लोक! आपल्याकडे एक म्हण आहे ''व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्'' अगदी सार्थ करणारे हे अद्वितीय असे आचार्य! यांच्यासारखे सर्वदेशी, सर्वस्पर्शी, सर्वंकष असे विभूतिमत्व विश्वसंस्कृतीत अनेक युगायुगांनी एखाद्याच वेळी जन्माला येते. अगदी वेदोत्तर काळापासून आजपर्यंत यांचा प्रभाव आपल्या भारतीय संस्कृतीवर सर्वाधिक राहिला आहे.

अनंत लोकोत्तर गुणांनी मंडित असलेलं हे थोर व्यक्तिमत्व म्हणजे भारतीय संस्कृतीचा मानदण्डच आहे. धगधगीत वैराग्य, द्रष्टेपण प्रतिभासंपन्न कवित्व, उदात्त साहित्यिक सद्गुण, लोकोत्तर ज्ञान, संकलन-संपादन-समन्वय याची अपूर्व अंतर्दृष्टी, मानवी जीवनाकडे पाहण्याची स्थितप्रज्ञता, धर्माचे यथार्थ आकलन, आदर्श सद्गुरुंची सद्गुणसंपदा, मातृ-पितृप्रत अढळ भक्ती, नैतिक उत्कर्षाचा ध्यास, समाजाला अध्यात्मप्रवण बनविण्याची जाज्वल्य निष्ठा, भव्य दिव्य प्राप्तीची निष्काम इच्छा व ध्यास, परंपरेचा सार्थ अभिमान असे अनंत गुण असलेला हा मेरूमणी!

व्यासांनी जे वाङ्मय रचले आणि संपादित केले त्याला 'व्यासचर्या' म्हणतात. भारतीय संस्कृतीची आठ अंगे म्हणजे धर्मकारण, राजकारण, अर्थकारण, समाजकारण, कला, वाङ्मय, शिक्षण-विज्ञान या सर्वांवर व्यासांइतका प्रकाश कुणीही टाकलेला नाही. अशी ही व्यासांची सर्वस्पर्शी, सर्वदेशी प्रतिभा म्हणूनच 'व्यासोच्छीष्टम् जगत्त्रयम' अशी म्हण पडली आहे. यांचे महाभारत म्हणजे संपूर्ण मानवी जीवनदर्शनच आहे. महाभारतात धर्म, अर्थ, काम, मोक्ष, याचे दिग्दर्शन केले आहे. वेदांच्या संहितांची रचना, ब्रह्मसूत्रांची निर्मिती, पुराणांची रचना, महाभारत नामक जयस्तंभाची उभारणी असे यांचे कर्तृत्व पाहिले कि मन थक्क होते.

व्यास म्हणजे व्यक्ति नसून उपाधी आहे असे बरेच लोक मानतात. ही उपाधी जे धारण करतात त्या महात्म्यांचे, महर्षींचे व्यासपीठ आहे.

कृष्णद्वैपायन म्हणजेच महाभारतकार व्यास महर्षी होय. वर्णाने सावळे आणि यमुनेच्या द्वीपात जन्मलो म्हणून यांना कृष्णद्वैपायन हे नाव पडले. पराशर मुनींचा पुत्र म्हणू यांना पाराशर्य असे म्हणतात. बदरिकाश्रमात तपश्चर्या केल्यामुळे 'बादरायण व्यास' म्हणतात. वेदांचा व्यास (विस्तार) केल्यामुळे व्यास/वेदव्यास म्हणतात. सत्यवतीसुत, कृष्ण, पराशरात्मज अशीही यांची महाभारतात नावे आली आहेत.

पराशर आणि सत्यवती यांचे पोटी यांचा जन्म झाला. चेदी देशाचा उपरिचरवसू नावाचा राजा होता. त्याची ही कन्या. राजकन्या त्यामुळे ती रुप संपन्नही होती आणि सद्गुणसंपन्नही. म्हणून तिला सत्यवती म्हणत. परंतु तिच्या देहाला माशाचा गंध येत असे म्हणून राजाने तिला धीवराकडे सोपवले आणि पालन करायला सांगितले. या आपल्या पित्याच्या सेवेसाठी सत्यवती काही काळ यमुना नदीत नाव चालवत असे.

एकदा पराशरमुनी तीर्थयात्रा करत होते. त्यावेळी सत्यवतीला त्यांनी पाहिले. सत्यवतीच्या अतीव रुपसंपन्नतेने तिला प्राप्त करण्याची अभिलाषा या ऋषींच्या मनात जागली. दोघांना परस्परांविषयी आकर्षण निर्माण झाले. हे केवळ शारीरिक नव्हते सत्यवती सद्गुण संपन्न होती तर पराशर बुद्धिमान होते. पराशरांनी संगमाची इच्छा

**डोके शांत असले तर निर्णय चुकत नाहीत. भाषा गोड असली तर माणसे तुटत नाहीत.**

प्रगट केली तेव्हा ती म्हणाली. नदीच्या दोन्ही तटावर ऋषी आहेत आणि आपले कौमार्य जाईल. त्यावेळी पराशरांनी आपल्या तपसामर्थ्याने आसमंतात धुके निर्माण केले. तिच्या शरीराला सुगंध लाभेल असा वर दिला आणि कौमार्य अभंग राहील असा वर दिला. अशारितीने वर मिळालेल्या सत्यवतीने पराशराशी समागम केला आणि तत्काळ एका पुत्रला जन्म दिला. अशारितीने यमुनेच्या द्विपात अत्यंत शक्तिशाली पराशर नंदन व्यास उत्पन्न झाले. आवश्यकता पडल्यास माझे स्मरण कर मी अवश्य येईन असे बोलून त्यांनी आपल्या आईचा निरोप घेतला व वडिलांबरोबर जाऊन तपश्चर्येस बसला.

**थोरवी**–यांची थोरवी अशी की धर्मसंस्कृतीची महत्ता व मर्मस्थाने यांना कळली. वेदराशींचे यांनी विभाजन केले. ऋग्वेद संहिता सिद्ध केली. गायनयोग्य ऋचा वेगळ्या करून त्याला सामवेद असे नाव दिले. यज्ञप्रक्रियेच्या गद्य भागाला यजुर्वेद बनविला.

लौकिक व्यवहाराचे मंत्र एकत्र करून अथर्ववेद सिद्ध केला.

ऋग्वेद –पैल, यजुर्वेद–वैशंपायन, सामवेद–जैमिनी, अथर्ववेद –सुमंतू या चौघाजणांकडे सुपूर्द केली. त्यामुळे वेदपरंपरा दृढावली. शिष्य–प्रशिष्यांच्या अनेक पिढ्यांनी हे वेद पूर्णत: आत्मसात केले.

पण याहीपेक्षा व्यासांचे अध्यात्मिक कर्तव्य खूप व्यापक आहे. उपासना, आत्मसाधना याची उभारणी यांनी दर्शनावर केली. वेदातील भगवंताचे अगोचर रुपाचे प्रतिपादन यानी ब्रह्मसूत्रात केले त्यामुळे परब्रह्माचे सांगोपांग निरुपण ब्रह्मसूत्रात आहे. हे सूत्ररुपात केले म्हणून याला ब्रह्मसूत्रे म्हणतात.

वेदाच्या चरम–सिद्धांताचे दर्शन यात होते म्हणू त्याला वेदान्त दर्शन म्हणतात. याला 'उत्तर मिमांसा' असेही म्हणतात.

वैदिक प्रस्थानत्रयीत (ब्रह्मसूत्रे उपनिषदे व गीता) यात ब्रह्मसूत्राचे स्थान प्रधान आहे. सर्व भारतीय तत्वज्ञानावर यांचा ठसा आहे. सर्व तत्वज्ञानच यांनी व्यापले आहे. श्रुतींनाही असे प्रस्थापित केले आणि नंतर पुराणांची रचना व विभागणी केली. श्रुति–स्मृतीनंतर भारतीय संस्कृतीत पुराणांनाच स्थान आहे.

पुराणे म्हणजे जनसामान्यांना कैवल्य प्राप्त करून देणारा राजमार्ग वेद ब्रह्मसूत्रांनी ज्ञानमार्ग सुप्रतिष्ठित केला तर आणि पुराणांनी उपासना भक्तीचा मार्ग लोकांसाठी विस्तारीत केला. वेदांची भक्ती पुराणांनी सुलभ केली. प्राचीन असूनही जे नवे असते ते पुराण पुराणात अनेक आख्याने, उपाख्याने, असतात. अठरा पुराणे आहेत. भारतीय संस्कृतीचा परिचय व त्याद्वारे धर्मसंस्थांचे रक्षण ही द्विविध अलौकिक कार्य पुराणे करतात.

भारतीय नीती, सदाचार, सभ्यता, संस्कृती यांचा प्रसार पुराणांनीच केला.

**महाभारत** – व्यासांच्या महाभारताला विश्ववाङ्मयात तोड नाही. मानवी जीवनाचे समग्र दर्शन, भाषेची रसाळता, वर्णनाची भव्यता यामुळे भारताला 'पंचमवेद' म्हणतात. एक लक्ष श्लोकांचा हा ग्रंथ नर–नारायण पर्वताच्या सान्निध्यात असलेल्या बदरीक्षेत्रात तीन वर्षे लेखन करून महाभारत निर्माण केले.

**महाभारत हा सांस्कृतिक महाकोश आहे.**

व्यासांच्या अतुलनीय प्रतिभेचे असिमित प्रतिबिंब म्हणजे महाकुरुक्षेत्रावरील भीषण युद्धानंतर त्यांनी महाभारत लिहिले. चतुर्विध पुरुषार्थ, विज्ञानशास्त्रे, इतिहास, लोकयात्रा, वर्णाश्रम, मोक्षधर्म, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, वाङ्मय, कला, भूतसृष्टी, श्रति–स्मृति–पुराणे, ब्रह्मर्षि–राजर्षीची चरित्रे, पुराणकथा, नीतिकथा, नीतिशास्त्र, रुढी, परंपरा, लोककला, भारतीय भूगोल, संस्कृती, गाथाशास्त्र, आख्यान, लोकधर्म, तत्त्वज्ञान, अध्यात्म इत्यादी अनंत विषयांची दृष्टान्तरूप यांच्या महान प्रतिभेने लिलया केली आहे. महाभारत नवरसांचे व्यासांच्या वाणीतून उमटलेले आणि गीतेचा उत्कट गंध ल्यालेले कमळ म्हणजे महाभारत!

**भागवत पुराणाची रचना :** महाभारताची रचना करूनही पारमार्थिक तृप्तीचा आनंद पूर्णपणे घेता आला नाही हे नारद त्यांनी सांगितले. त्यावर नारद म्हणाले 'महाभारत लिहून चतुर्विध पुरुषार्थ दाखवला पण लोकांच्या मलिन अंत:करणात भगवंताचे निर्मळ चरित्र/यश जेणेकरून सुप्रतिष्ठित होईल आणि ते भगवंताकडे वळतील असा भगवंताचा महिमा.

नारदाच्या आज्ञेप्रमाणे अज्ञानी लोकांसाठी परमेश्वराविषयी भक्ती उत्पन्न होर्सल अशा तऱ्हेची भागवत संहिता तयार करून १२ स्कंध व १८००० श्लोक असा भागवताचा प्रचंड विस्तार आणि श्रीकृष्णाचे लोकोत्तर–पावन–चरित्र साद्यंत वर्णिले. श्रीकृष्ण भक्ती श्रीकृष्णाविषयी त्याच्या मनात अत्यंत पूज्य आणि अढळ श्रद्धा होती.

**उपदेश :** व्यासाच्या रुंदीवर वर्तुळाचा परिघ असतो. मानवाच्या व्यक्तिमत्वाचा व्यास जितका मोठा तितके त्याच्या पराकम्राचे सत्कार्याचे वर्तुळ मोठे.

श्री व्यासांचे आपल्या संस्कृतीवर असीमित ऋण आहे. कारण भागवताचा एकादश स्कंध आणि श्रीगीतेचे १८ अध्याय ग्रथित करून त्यांनी जगातील सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञान–प्रत्यक्ष भगवंताचे गीत आपल्या हाती सुपूर्द केले.

**नमोस्तुते व्यास विशाल बुद्धे।**
**फुल्लारविंदाय तपत्र नेत्र ।।**
**येन त्वया भारत तैलपूर्णा ।**
**प्रज्वालितो ज्ञानमय: प्रदीप: ।।**

**– अनघा चिपळूणकर**

# विवाहेच्छुक....!

**ऐश्वर्या राजेंद्र साक्रीकर,** ९ सप्टें.१९९४, ऋग्वेदी, विश्वामित्र, ५'४', आर्किटेक्ट शेवटचे वर्ष
**पार्थ राजीव कायदे,** २४ ऑक्टो.१९९७, देशस्थ ऋग्वेदी, भारद्वाज, ५'५''बी.कॅाम
**मयुरेश मंगेश संत,** २० नोव्हें. १९८९, देशस्थ ब्राह्मण, मुद्‌शाल, ५'७'' बी.आर्ट्स
**कौस्तुभ प्रदिप कुलकर्णी,** १३ जुलै १९९१, ब्राह्मण कश्यप, काश्यप, ५'८'', बी.कॅाम
**भाग्यश्री सुरेश कुलकर्णी,** २७ जून १९९१, ब्राह्मण कुत्स, वत्स, ५'२'', बी.कॅाम
**नीरजा अनिल तुंगतकर,** २२ नोव्हें. १९८७, देशस्थ कश्यप, काश्यप, ५'१'', बी.कॅाम एल.एल.बी.
**सिद्धार्थ अरुण वैद्य,** २६ मे १९८९, ब्राह्मण, गार्ग्य, ५'५'', १२ कॉम्पुटर
**अनुप नरहर पुजारी,** १८ नोव्हें. १९८३, दे.य. ब्राह्मण, कौशिक, ५'६'', पुजारी
**त्रिविक्रम श्रीनिवास अंधारे,** २६ नोव्हें. १९८७, दे.ऋग. ब्राह्मण, कौशिक, ५'११'', बी.टेक. आई.टी.
**चैतन्य रमेश कुलकर्णी,** ६ नोव्हें. १९८४, ब्राह्मण, गार्ग्य, ५'९'', बी.कॉम. एम.सी. एस.सी.
**संकेत संजीव प्रभुमिराशी,** २५ डिसें. १९८६, कऱ्हाडे ब्राह्मण, वसिष्ठ, ५'४'', बी.कॅाम कॉम्पुटर हार्डवेअर
**अमृता मोहन शेंडे,** २ मे १९८३, ब्राम्हण कोकणस्थ, शांडील्य, ५'६'', बी. इले. (Computer)
**विणा संजय पागे,** ६ मे १९९२, दे.रूग्वे. ब्राह्मण, ४'१'', बी.एस.सी. मॅक्रोबायोलोजि
**सुजाता अजय येरवडेकर,** १० जाने. १९८८, दे.ऋग. ब्राह्मण, भारद्वाज, ५'११'', बी.डी.एस.
**मंदार श्रीनिवास पंडित,** २७ नोव्हें. १९८३, देशस्थ ब्राह्मण, कश्यप, ५'८'', एम.कोम. डी.बी.एम.
**सचिन पुरोहित,** २६ एप्रिल १९८४, दे. रूग. ब्राह्मण, अत्री, ६', एम. कॉम.
**सुमित हेमंत अगटे,** ३ डिसें. १९८७, दे.येजू. ब्राह्मण, कौशिक, ५'७'', बी.कॅाम
**अमित हेमंत अलाटे,** २५ डिसें. १९८४, दे.यजु. ब्राह्मण, कौशिक, ५'५'', बी.एड. (इकॉनोमीक्स)
**महेश माधव साने,** १५ जुलै १९८२, कोकणस्थ ब्राम्हण, कपि, ५'६'', पोस्ट ग्रॅज्युएट, पी.एच.डी.
**मानस मुकुंद देशपांडे,** ९ सप्टें. १९८४, ऋग्वेदी ब्राम्हण, वसिष्ठ, ५'४'', डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल.
**ओंकार विलास फडके,** १३ एप्रिल १९८०, ब्राम्हण, अत्री, ५'८'', एच.एस.सी. इलेक्ट्रीकल
**अश्विनी प्रभाकर केळकर,** १० ऑक्टो. १९८१, ब्राम्हण कोकणस्थ , शांडील्य, ४ फूट ९.५ सेमी., कॉम्पुटर (पी. ए.)
**रसिका अविनाश इनामदार,** १९ एप्रिल १९८६, ऋग्वेदी ब्राम्हण, भारद्वाज, ४'११,'ग्राफिक डिझाइनर
**नचिकेत अनिल वांगीकर,** ६ सप्टें. १९८१, देशास्थ यजुर्वेदी, गार्ग्य, ५'७'', बी.कॅाम. डी.बी.एम.
**देवेश शैलेश वैद्य,** २१ ऑक्टो. १९९१, हिंदू ब्राम्हण, गार्ग्य, ५'४'', एस.व्हाय.बी.ए.
**राहुल विष्णू सबनीस,** २२ फेब्रु.१९९२, ब्राम्हण ऋग्वेदी, शाण्डील्य, ५'११'', एम.एस.सी.बायोटेक
**राहुल हरी बेलसरे,** ५ नोव्हें. १९८३, ऋग्वेदी ब्राम्हण, भारद्वाज, ५'११''एम. कॉम.
**अंकित शिरीष कुलकर्णी,** २३ नोव्हें. १९९०, हिंदू ब्राम्हण, उपमंन्यु, ५'७'', एम. कॉम.
**निनाद मुकुंद गायधनी,** ३१ जाने. १९८९, ब्राम्हण यजुर्वेदी, संकृत, ५'९'', डिप्लोमा इन मल्टीमीडीया
**शार्दुल श्रीपाद पानसे,** १३ डिसें. १९७९, दे.रूग. ब्राह्मण, शाण्डील्य, ५'११'' बी. कॉम.

**संपर्क : अ. ब्रा. मध्यवर्ती संस्था कार्यालय, नाशिक**

## जाहिर आवाहन

महागाई वाढल्यामुळे कागद व प्रिंटींगचे दरही वाढले आहेत. त्यामुळे सभासदांना आजीव सभासद वर्गणीत सन्मार्गमित्र पाठवता येत नाही. यापुढे जे सभासद रु. १००/– प्रतिवर्ष संस्थेकडे सन्मार्गमित्रसाठी जमा करतील त्यांनाच अंक पाठविला जाईल याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी व संस्थेकडे आपली वार्षिक वर्गणी जमा करून पावती घ्यावी ही विनंती.

**दिनांक २५ जुलै २०१८ ते २४ ऑगस्ट २०१८**
**या कालावधीतीतील सभासदांचे वाढदिवस**

१. श्री. सतिष करजगीकर, नाशिक .........दि. १.८.२०१८
२. श्री. विनोद कुलकर्णी, नाशिक.............दि. २६.८.२०१८

वाढदिवसाच्या **हार्दिक शुभेच्छा!**

## भावपूर्ण श्रद्धांजली!

दांडेकर टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या माजी मुख्याध्यापिका व लेखिका सौ. विजयताई रवळगावकर तसेच ए. पी. केटरर्सचे श्री. अजय आगाशे यांच्या मातोश्री अक्षया आगाशे यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. संस्थेच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**थोड्याच महिला आपलं खरं वय कबूल करतात आणि थोडेच लोक वयाप्रमाणे वागतात.**

# सुवर्णसंधी शुभारंभानिमित्त फक्त रु. ५००/- मध्ये विवाह इच्छुकांची नोंदणी मुदत ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत

संस्थेच्यावतीने लवकरच सर्वसमावेशक अशी विघ्नहर्ता वधु-वर सहाय्यक मंडळ या नावाने एक अतिशय उत्कृष्ट वेबसाईट तयार करण्यात येत आहे. या वेबसाईटच्या सहाय्याने कोणत्याही जाती-धर्माचे लोक अनुरूप अशा वधु-वराची निवड करू शकतील. या वेबसाईटचे वैशिष्ट्य असे असेल की, आपण अगदी मोबाईलवर सुध्दा या वेबसाईटचा वापर करू शकता. या वेबसाईटवर आपले नाव नोंदणी करण्यासाठी आवश्यक असणारी फी सुध्दा आपण मोबाईलच्या माध्यमातून भरू शकता. अशा सर्व सोयीनीयुक्त मराठी व इंग्रजी भाषेची सोय असलेली हि वेबसाईट प्रत्येकासाठी उपयोगी ठरणार आहे. ज्यांची नोंदणी करावयाची असेल त्यांचे **आधारकार्ड** या ठिकाणी आपणास पाहावयास मिळेल. म्हणजेच या वेबसाईटवर नोंदणी झालेल्या इच्छुकांची माहिती आपल्याला तपासून पाहणे सोयीचे होईल. अशी सोय असलेली हि पहिली वेबसाईट असावी. सर्व सभासद तसेच सर्व जाती धर्माच्या नागरिकांना आवाहन करण्यात येते की, प्रत्येकाने या वेबसाईटला भेट द्यावी व आपल्याला आवश्यक ती माहिती भरून वधु-वर निवड करावी हि नम्र विनंती.

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था व समाज सहाय्यक संस्था, नाशिक संचलित**

## विघ्नहर्ता वधु-वर सहाय्यक मंडळ

## vighnahartamatrimony.com

**हि वेबसाईट सर्व जाती धर्मियांच्या उपवर-वधू करीता सुरू करण्यात येत असून इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| **वेबसाईटच्या शुभारंभा निमित्त खास सवलतीच्या दरात आपण आपले नाव नोंदवू शकतात.** | **सवलतीचा दर**<br>**रु. : ५००/-**<br>**कालावधी : १ वर्ष** |

**१ ऑक्टोबर २०१८ पासून सदर वेबसाईवर नोंदणी फक्त ऑनलाईनच करता येणार असून त्याचे दर खालील प्रमाणे असतील.**

| | |
|---|---|
| ३ महिन्यांकरीता : १०००/- | १ वर्षासाठी : ३०००/- |
| ६ महिन्यांकरीता : २०००/- | १ वर्षानंतर नुतनीकरणास : १०००/- |

*** ऑफ लाईन नाव नोंदणी फॉर्मसाठी संपर्क ***

| | | | |
|---|---|---|---|
| नाशिक | : +९१ २५३ २३१३५९९ | जुन्नर | : ९९७५६०३७७६ |
| नाशिक (पंचवटी) | : ७९७२२४२१६५ | फलटण | : ९८६०७२८६९८, ९४२१८८१५६३ |
| पुणे | : +९१ ०२० २४४३६९२२ | निरा (पुरंदर) | : ९८२३३२६६८४ |

**३० सप्टेंबर २०१८ पूर्वी फॉर्म भरून वरील ठिकाणी जमा करावेत.**

## 'सन्मार्ग मित्र' लेखन पाठविण्याकरिता सुचना

१. राजकिय विषय सोडून कोणत्याही प्रकारचे लिखाण पाठवावे.
२. लिखाण कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहिलेले अथवा टाईप केलेले असावे.
३. ब्राह्मण समाजातील विविध संस्था कार्यरत आहेत. त्यांनी आपआपल्या संस्थांच्या कार्यक्रमाचे वृत्तांत मुद्देसुद पाठविल्यास त्या लिखाणाला प्राधान्य देण्यात येईल.
४. प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंयत लिखाण संस्थेच्या कार्यालयात पोहोचेल या बेताने ते पाठवावे.
५. मासिकाच्या ध्येय धोरणाला अनुसरुन लिखाणामध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार संपादकांनी राखून ठेवला आहे.
६. लिखाण स्वीकृत अगर अस्वीकृत करणे संपादकांच्या अधिकारात राहिल. अग्राह्य लिखाणास कारण देण्याचे बंधन संपादकांवर नाही. तसेच लिखाणास कोणतेही मानधन दिले जाणार नाही.
७. मासिकात व्यक्त होणाऱ्या मतांशी संस्था किंवा संपादक सहमत असतीलच असे नाही.

## * विनम्र आवाहन *

**१. संस्थेच्या सर्व सभासदांनी आपला बदललेला अथवा नवीन पत्ता, फोन नंबर, मेल आयडी इत्यादी संस्था कार्यालयात येऊन अथवा पत्राद्वारे अपडेट करावा ही विनंती.**

**२. ब्राह्मण समाजातील सर्व जाती, पोट जातीच्या समाजबांधवांनी अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे सभासद व्हावे ही नम्र विनंती. (आजीव सभासद वर्गणी रु. ५०१/- मात्र) सभासदत्वाचा अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असून आपले ओळखपत्र, निवासाचा पत्ता व एक फोटोसह आपला विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयात भरून द्यावा.**

## संस्थेची केंद्र कार्यालये

| | |
|---|---|
| **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक केंद्र**<br>**केंद्र प्रमुख : श्री. महेश शुक्ल,** मो. : ९८८११२४१४४<br>जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबल जवळ, त्र्यंबकरोड, नाशिक - ४२२ ००२. फोन : २५७२३२६ | **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पंचवटी, नाशिक**<br>**केंद्र प्रमुख : श्री. प्रदिप भानुवंशे** मो. : ७९७२२४२१६५<br>घर नं. ४४७७, भानुवंशे वाडा, भोंडे गल्ली, कपालेश्वर मंदिरामागे, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३ |
| **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पुणे केंद्र**<br>**प्रभारी केंद्र प्रमुख : ॲड. गणेश गोखले**<br>'कौशिक', १२९३, सदाशिव पेठ, पुणे -३०.<br>फो : ०२०-२४४३६९२२ | **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, जुन्नर केंद्र**<br>**केंद्र प्रमुख : श्री. रामचंद्र वैद्य**<br>मो. : ९९७५६०३७७६<br>बेलवलकर सभागृह, बुधवार पेठ, जुन्नर, जि. पुणे |
| **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नीरा केंद्र**<br>**केंद्र प्रमुख : श्री. दत्तात्रय त्रिंबक बडबडे**<br>मो. : ९८२३३२६६८४<br>समर्थ बंगला, बाजार तळ, मराठी शाळे मागे, नीरा, ता. पुरंदर जि. पुणे | **अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, फलटण केंद्र**<br>**केंद्र प्रमुख : श्री. भालचंद्र दत्तात्रय ताथवडकर**<br>मो. : ९८६०७२८६९८<br>११८, कसबा पेठ, सईबाई शॉपिंग सेंटरमागे, फलटण, जि. सातारा |

**अश्रू कितीही प्रमाणिक असले तरी भूतकाळ परत आणण्याची ताकद त्यांच्यात नाही.**

# निमाचे नवनिर्वाचित सदस्य श्री. प्रदीप पेशकार यांचा संस्थेच्या वतीने सपत्नीक हृद्य सत्कार



भारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष नाशिक येथील ज्येष्ठ उद्योजक श्री. प्रदीप पेशकार यांची नुकतीच महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाच्या लघु व मध्यम उद्योग समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्याचप्रमाणे नाशिक येथील नाशिक इंडस्ट्रिज अ‍ॅन्ड मॅन्यूफॅक्चरर्स असोसिएशन (निमा) या संस्थेच्या नुकत्याच झालेल्या चुरशीच्या निवडणुकीत त्यांच्या नेतृत्त्वाखाली लढविल्या गेलेल्या उद्योग विकास आघाडीच्या पॅनलने जोरदार मुसंडी मारून सत्ता परिवर्तन घडवून आणले. याबद्दल अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या वतीने त्यांचा व त्यांच्या पत्नी सौ. अश्विनी पेशकार यांचा नुकताच संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. गणेश गोखले यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष उदयकुमार मुंगी, कार्यवाह अजित चिपळूणकर, सहकार्यवाह गं. ना. कुलकर्णी, कोषाध्यक्ष मिलिंद गांधी, सुभाष सबनीस, उल्हास पंचाक्षरी, महेश शुक्ल, सतिष करजगीकर, अ‍ॅड. समीर जोशी, चंद्रशेखर गायधनी, सुजाता करजगिकर, गायत्री चित्रगीमठ, सुरेखा गायधनी, वसुधा जोशी, इंदिरा शिंगणे, अ‍ॅड. सतिश बाल्टे, पद्मा गोखले, रोहिणी कुलकर्णी, योगेश शिंगणे, सुप्रिया सबनीस, मैत्रेयी शिंगणे, आर्या शिंगणे, सोहम जोशी, अनघा सबनीस व संस्थेचे सभासद उपस्थित होते.

ए. पी. केटरर्स
पेशवाई केटरर्स



अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था,
जलशुद्धिकरण केंद्रा शेजारी,
त्र्यंबक रोड, नाशिक

श्री लक्ष्मीनारायण भवन,
हॉटेल साई पॅलेसमागे,
मुंबई आग्रा रोड, नाशिक

रुचकर भोजन, स्वच्छता व वक्तशीरपणा हाच आमचा बाणा!

सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी हॉल व केटरींगची उत्तम व्यवस्था व सुयोग्य व्यवस्थापन
मुलीच्या बारशाला, मुलीच्या वाढदिवसाला, एकाहत्तरी, पंचाहत्तरी, सहस्त्र चंद्रदर्शन तसेच सेवानिवृत्तीच्या
कार्यक्रमास हॉल मोफत*

श्री. प्रमोद पंडित
भ्रमणभाष : ८४४६९३०२४२

श्री. अजय आगाशे
भ्रमणभाष : ९६८९८९४१११

* नियम व अटी लागू

# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक पुणे केंद्र आयोजित विद्यार्थी गुणगौरव व शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याची क्षणचित्रे



















बुक-पोस्ट

प्रति,

श्री. ------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------